# प्रेस नोट

**मोका. गुन्हयासह बुलडाणा जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत दरोडा, चोरी, जबरी चोरी, घरफोडी, शरीराविरुध्द गुन्हे करणारा अट्टल गुन्हेगार स्थानिक गुन्हे शाखा बुलडाणा यांचे जाळयात.**

बुलडाणा जिल्हयासह राज्यातील विविध जिल्हयात टोळीने गुन्हे करणारा अट्टल गुन्हेगार किशोर ऊर्फ मुंगळ्या बिरजु भासले रा नाव्हा टी पॉईट सिंदखेड राजा ह.मु.धांदरवाडी याने सन २०१७ पासुन ते आजपावेतो बुलडाणा जिल्हयासह राज्यातील ईतर जिल्हयात मोका गुन्हयासह दरोडा, चो-या, जबरी चो-या, घरफोड्या, शरीराविरुध्दचे गुन्हे करणारा गुन्हेगार किशोर ऊर्फ मुंगळ्या बिरजु भासले रा नाव्हा टी पॉईट सिंदखेड राजा ह.मु.धांदरवाडी हा धांदरवाडी ता.सिंदखेड राजा येथे येवुन शेतात लपुन बसल्याबाबतची गोपनीय माहिती स्थानिक गुन्हे शाखा बुलडाणा पथकाला मिळाल्याने दिनांक २१.०७.२०१९ रोजी मा. पोलीस अधीक्षक बुलडाणा श्री डॉ.दिलीप-पाटील भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. महेंद्र देशमुख स्था.गु.शा बुलडाणा यांचे नेतृत्वात स्था.गु.शा. चे पथक पो.उप.नि. प्रदिप आढाव, पो.हे.कॉ. सुधाकर काळे, विलास काकड, पो.ना. रघुनाथ जाधव, दिपक पवार, पंकजकुमार मेहेर, पो.कॉ. युवराज मुळे, श्रीकांत चिचोले, विजय सोनोने, चालक बोर्डे यांची नेमणुक करुन सदर पथकाने खबरी मार्फत व तांत्रीक माहितीच्या आधारे ग्राम धांदरवाडी येथे सापळा रचुन शिताफीने अट्टल गुन्हेगार किशोर ऊर्फ मुंगळ्या बिरजु भासले यांस ताब्यात घेतले.

सदर गुन्हेगाराची पथकाने सखोल चौकशी केली असता त्याने त्याचे (फरार) पाच ते सहा साथीदारासह पुढील प्रमाणे गुन्हे केल्याची कबुली दिली आहे.

१. पो.स्टे. सिंदखेड राजाः- कलम ३९४,३५२,३४,४५७,३८०,३०७,४५२,१४७,१४८ भांदवी/गैरकायद्याची मंडळी या विविध कलमाखाली ५ ते ६ गुन्हे केल्याची कबुली दिली आहे.
२. पो.स्टे. देऊळगांव राजाः- कलम ३९४,३४,४५७,३८० भादंवी गुन्हयाखाली ४ गुन्हयाची कबुली दिली आहे.
३. पो.स्टे. किनगांव राजाः- कलम ४५७,३८० भादंवी गुन्हयाखाली २ गुन्हे केलेले असुन १ गुन्हयाची कबुली दिली आहे.
४. पो.स्टे.चिखलीः- कलम ३८०,३४ भादंवी गुन्हयाखाली दांडगे पेट्रोलपंपावर साथीदारसह गुन्हा केला असल्याची कबुली दिली आहे.
५. पो.स्टे. चारठाणा जिल्हा परभणी येथे ३९५,३९७ भादंवी सह मो.का या गुन्हयामध्ये फरार असल्याबाबत कबुली दिली आहे. तसेच सदर आरोपी पोलीस स्टेशन सिंदखेड राजा येथील अप क्रमांक ११४/१८ कलम ३०७,४५२,१४७,१४८,१४९ भादंवी गुन्हयामध्ये गुन्हा करुन फरार आहे.
६. वरील प्रमाणे बुलडाणा जिल्हयातील विविध भादंवी कलमाखाली १५ गुन्हे साथीदारासह केल्याची कबुली दिली असुन त्याच्याकडून कि.१,५०,०००/- रु चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे. सदर अट्टल गुन्हेगार याने त्याचे साथीदारासह जालना जिल्हयातील १. पो.स्टे. टेंभुर्णी २. पो.स्टे. जालना शहर येथे चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली असुन

बुलडाणा जिल्हयासह राज्यातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत चोरी, जबरी चोरी, दरोडा या सारखे गुन्हे केल्याचे उघडकीस येवु शकते. सदर आरोपीस ताब्यात घेवुन पुढील कार्यवाहीसाठी पो.स्टे. सिंदखेड राजा यांच्या ताब्यात दिले आहे.

24/07

पो.नि.स्था.गु.शा
बुलडाणा

